५

# "शिक्षकांचे व्यावसायिक बांधिलकी एक अभ्यास ''

**डॉ सिबील थॉमस**
सहयोगी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ

**कांबळे कविता रामचद्र**
पीएच .डी विद्यार्थी शिक्षणशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ

सारांश ः

शिक्षकांची ज्ञानोपासना विदयार्थ्यीप्रती समाजाप्रती ज्या प्रमाणे बांधिलकी असणे आवश्यक आहे . शिक्षणाचे बोधात्मक,भावात्मक ,क्रियात्मक विकास करणे हे उदिष्टय आहे . ते साध्य करण्यासाठी शिक्षकाजवळ बांधिलकी असणे आवश्यक आहे . त्यामुळे त्यांना वेळापत्रकानुसार तास घेणे नेमून दिलेल्या विषय ठराविक कालमर्यादित शिकवून पूर्ण करणे परिक्षाव्दारे घेऊन मूल्यामापन करणे निकाल तयार करणे हजेरी पत्रक तयार करणे उपक्रमाचे आयोजन करणे कार्यवाही करणे इ .शिक्षकांच्या जबाबदाऱ्या आहेत . त्या व्यवस्थित पार पाडून विदयर्थी मध्ये इष्ट तो वर्तनबदल करणे हे बांधिलकी मध्ये अभिप्रेत आहे . परंतू आज शिक्षणाच्या बोधात्मक विकासाकडे जास्त लक्ष दिले जाते . भावात्मक व क्रियात्मक विकासाकडे दुर्लक्ष केले जाते . पंरतू संशोधिकेला संशोधनातून असे दिसून आले की शिक्षकांची व्याव्यसायिक बांधिलकी कमी होत आहे म्हणुन शिक्षकांच्या अपेक्षित उदिष्टयाची साध्यता कमी होताना दिसत असल्यामुळे शिक्षकांची शिक्षणाप्रती बांधिलकी कमी होताना दिसुन येते आधुनिक युगात शिक्षकांची व्यवसायाप्रती बांधिलकी असली तरी सर्व क्षेत्रात खुप चढा ओढ निर्माण झाली आहे . माणसामाणसातील मैलाचे अंतर कमी झाले आहे .दुसरीकडे मानसिक अंतर वाढल्यामुळे माणूस एकमेकापासून दूर जात आहे .व्यक्ती मधील परस्पर संबध मध्ये स्वाभाविकपणा एवेजी कृत्रिमता भावनिक ओलाव्या ऐवजी कोरडेपणा विशुदध मैत्री ऐवजी स्वार्थीपणा आढळुन येत आहे .त्यामुळे बेकारी दारिद्र भष्ट्राचार महागाई गुन्हेगारी परस्परातील हेवेदावे यासारखे प्रश्न निर्माण होत आहे . सदय परिस्थीती पहाता आजचा शिक्षक हा तणावग्रस्त होत चालला आहे .यामुळे तो वैफल्यग्रस्थ होत आहे .आणि या वाढत्या ताणताणावामुळे शिक्षक हा व्यवसायिक बांधिलकी विसरत चालला आहे व तो नवीन पीढी घडवत आहे यासाठी त्याला योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे आहे .

प्रस्तावना

बाधिलकी म्हणजे एकनिष्ठपणा निष्ठा एखादया कल्पनेबाबत विचाराबाबत अथवा व्यवस्थेबाबत व्यक्तीच्या प्रत्यक्ष कृतीतून दिसून येणारा दृढविश्वास म्हणजे बांधिलकी बाधिलकी किवा असलेली व्यक्ती आपली तत्वे आणि नियोजित कार्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करण्यास तयार असते .

Cambridge international Dictionary of English नुसार commitment means to promise of give (your loyalty ormoney) to particular principal person or plan of action.

मानवी जीवन गतिमान आहे . स्थुलमानाने हा विकास शिक्षणातून होतो . असे मानले जाते म्हणुन तो जन्मापासून मुत्यूपर्यंत शिक्षण घेतच असतो . "विदया गुरूणा गुरू" असे प्राचीन काळापासुन सांगितले जात आहे . म्हणजे विदया मिळाल्या शिवाय भावी यशस्वी जीवनाची तयारी होऊ शकत नाही . म्हणुन भारतीय राज्यघटनेने ४५व्या कलमानुसार प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे . पूर्वी घरातून दिले जाणारे औपचारिक शिक्षण आजच्या विज्ञान युगातील बालकाचा सर्वागीण विकास घडवुन आणण्यास पुरेसे ठरणे शक्य नाही . कारण सर्वच प्रकारचे अनुभव मिळतील हे निश्चीत सांगता येत नाही . त्याकरिता हेतूपूर्वक जाणीव पूर्वक शिक्षण देणे आवश्यक आहे . म्हणुन ते शाळाच्या माध्यमाने शिक्षकाव्दारे दिले जावू लागले .

उदयाच्या भावी भविष्याची पीढी घडविण्याचे काम शिक्षंकाकडे असल्याने त्याची व्यावसायिक बांधिलकी असणे आवश्यक आहे . या करिता एन . सी . टी . ई . ने . शिक्षक प्रशिक्षणासाठी व्यवसाय बांधिलकीची पाच क्षेत्रे सांगितली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत .

- विदयार्थ्याच्या प्रति असलेली बांधिलकी
- समाजाच्याप्रति असलेली बांधिलकी
- व्यवसायाच्या प्रति असलेली बांधिलकी
- श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधिलकी
- जुनी मानवी मुल्ये याच्या प्रति असलेली बांधिलकी

जेणे करून व्यक्तीला व्यक्तीगत व सामाजिक जीवनात सुख समाधान व यश प्रात्पी होते . त्याच प्रमाणे शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरिता मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विदयार्थी यांनी आपल्या जबाबदा–या व कर्तव्य पार पाडावी म्हणुन एन . सी . टी . ई ने सांगिलेली व्यावसायिक बांधिलकी क्षेत्र महत्वाचे आहेत .



Vol: 5th , Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June. 2016,ISSN : 2319-5525

त्याच प्रमाणे शिक्षकांच्या सदयस्थिती बद्दल बोलताना शिक्षणतज्ञ जे . पी . नाईक म्हणतात की, शिक्षकांमधील ज्ञानोपासना ,विदयार्थ्या ,समाजाशी शिक्षकांशी बांधिलकी कमी होत आहे . त्यांच्या मताचा विचार करता आपल्याला असे म्हणता येईल की आजच्या काळात शिक्षकांची बांधिलकी कमी होऊ लागली आहे . शिक्षकांची ज्ञानोपासनेची बांधिलकी असणे . शिक्षकांनी आपले आयुष्य अध्ययन अध्यापन या कार्यात व्यतीत करावे . त्या करिता त्यांनी नियमित वाचन केले पाहिजे . नवनवीन प्रयोग स्पर्धा व उपक्रमामध्ये सहभागी होणे . कार्यशाळा ,चर्चासत्र,परिषदामध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वःसतत अदययावत ज्ञान आत्मसात केले पाहिजे म्हणजे ज्ञानोपासनेला अग्रस्थान दिले तर त्यांची बांधिलकी वाढू शकते . बदलत्या काळाशी जुळवून घेण्यास बरेच शिक्षक तयार नसावे किंवा आपली परंपरागत अध्ययन अध्यापन पद्धतीला ते चिटकुन राहत असल्याने त्याची ज्ञानोपासनेची बांधिलकी कमी होत आहे . असे म्हटले गेले आहे . आजचे विदयार्थी हे उदयाचे जबाबदार नागरीक आहेत . त्यामुळे त्यांच्या मध्ये ज्ञानलालसा व्हावी ज्ञान मिळविण्याची त्याची शक्ती वाढावी जीवनावश्यक कौश्यल्य ही प्रत्येक विदयार्थीच्या व्यक्ती भेदानुसार क्षमता, कल, अभिरूची, गरजा, लक्षात घेऊन प्रत्येकाला समजुन त्यांच्या परिपूर्ण विकास व्हावा यासाठी त्याला मदत व मार्गदर्शन करून त्याचा विकास करणे ही शिक्षकांची बांधिलकी आहे . शिक्षकांचा समाज बांधणीचे काम करावे लागते . मानवता, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि व्यक्ती प्रतिष्ठा हया मुल्यावर आधारित समाज निर्माण करण्यासाठी शिक्षकांचे वक्तशीरपणा, सवेदनशीलता, नीटनेटकेपणा,स्त्री पुरूष समानता ,श्रमप्रतिष्ठा,राष्ट्रभक्ती,वैज्ञानिक दृष्टीकोन,राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्म समभाव सहिष्णूता आणि सौजन्यशीलता ही मूल्य प्रत्येक पाठातून रूजविणाचा प्रयत्न केलाच पाहिजे परंतू बहुतेक शिक्षक खााजगी शिकवण्या घेतात व त्यामुळे बरेच शिक्षक वर्गामध्ये अभ्याक्रम संपवावा म्हणुन फक्तपुस्तके वाचुन दाखवितात मग असे शिक्षक मुल्य सर्वधन करण्यास असमर्थ ठरतात . त्यामुळे जे . पी नाईक यांना म्हणायचे की विदयार्थ्यीप्रती समाजाप्रति बांधिलकी कमी होत आहे .

व्यावसायिक बांधिलकी ही प्रशिक्षणाच्या महाविदयालयातून निर्माण व्हायला पाहिजे व बी . एडच्या अभ्यासक्रमात बांधिलकी विकसित होण्यासाठी उपक्रम राबविणे आणि अभ्यासक्रमात त्यांच्या अनुषंगाने आवश्यक घटकाचा समावेश करणे गरजेचे आहे . सेवापूर्व प्रशिक्षणा बरोबर सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात बांधिलकीवर उद्बोधन वर्ग घेण्याची गरज आहे . शिक्षकांना व्यवसाय समाधान प्राप्त करून देण्यासाठी शाळेच्या संस्थेने शिक्षकांना प्राथमिक सुविधा पुरविणे आवश्यक आहे . उदा शैक्षेणिक साधने, वर्ग अध्यापन स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य, योग्य वेतन इ . शिक्षक समाधानावर विपरित परिणाम होऊन त्याचे कार्य निष्कृष्ट दर्जाचे होणार नाही हयाकडे संस्थाचालकानी लक्ष दयावे . उच्च शिक्षित शिक्षक असल्यास त्याच्या अर्हतेनुसार वेतन श्रेणीत वाढ असावी . तरच उत्तम शिक्षणाची कास धरली जाईल व संपादन प्रेरणा ही वाढेल . प्रशिक्षणार्थीना व्यावसायिक बांधिलकीचे महत्त्व पटले पाहिजे . प्रशिक्षणांर्तगत जे प्रशिक्षण मिळाले आहे . त्या प्रशिक्षणामधुन व्यवसाय समाधान होण्यासाठी कशा प्रकारे काम करावे याची जाणीव व्हायला हवी,तरच माध्यमिक शिक्षकांमध्ये व्यावसायिक बांधिलकी, व्यावसायिक समाधान मिळविण्यासाठी क्षमता निर्माण होईल .



Vol: 5th , Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June. 2016,ISSN : 2319-5525

व्यावसायिक बांधिलकी संकल्पना ः

केंब्रिज आंतरराष्ट्रीय इंग्रजी शब्दकोशाप्रमाणे बांधिलकी म्हणजे एखादया मुख्याला, व्यक्तीला किवा कृतीयोजनेला वचन, निष्ठा अथवा पैसे देणे होय. व्यावसायिक बांधिलकी ही एक मानसिक नाते, व्यक्तीचा व्यवसाय व त्याच्याशी निगडीत भावनिक प्रतिसाद यात निर्माण होते.

मेयर आणि अलेन. (१९७७),यांनी असे म्हटले कि, व्यावसायिक बांधिलकी मानसशास्त्राशी सहसंबध आहे आणि आकर्षक बांधिलकीत व्यक्तीचे त्यांच्या व्यवसायासंबधीचा जिव्हाळा असतो. बांधिलकी जीवनाच्या मध्यभागी ठेऊन ती वाढविण्याचा व्यक्ती आटोकाट प्रयत्न करतो.

सकारात्मक किंवा नकारात्मक दृष्टीकोनाचा व्यक्तीच्या व्यावसायिक बांधिलकीच्या पातळीवर परिणाम होतो. (हॉल :२००५) यांनी असे म्हटले, नेहमीच्या बांधिलकीत स्वतःच्या व्यवसाय सातत्यपूर्णरित्या चालविण्यात धन्यता वाटते.

आर्थिक घटकांपेक्षा, कुटुंब, सहकारी, काम करण्याच्या ठिकाणाची स्थिती, अधिकाऱ्याबाबतीत मान इ. बाहयघटकाचा व्यावसायिक बांधिलकीवर परिणाम होऊन उदयोग सुरू ठेवण्यात प्रेरणा मिळते. 'सातत्यपूर्ण बांधिलकी यामध्ये व्यक्तीला त्याचा व्यवसाय सुरू ठेवण्यात स्वारस्थ असते. आशा प्रकारची बांधिलकीत व्यवसाय बदलासाठी लागणारा खर्च किंवा व्यक्तीने त्यांच्या सध्याच्या व्यवसायात केलेली गुंतवणुक यामुळे व्यक्ती त्याच उदयोगात राहण्याचे बंधन आणतो. (जहीर :२००३) व्यावसायिक बांधिलकी म्हणजे व्यक्तीच्या स्वःत्वाला परिणाम करणारी कामगिरीची पातळी होय. (लोडळ आणि केजनेर, १९६५) व्यावसायिक बांधिलकी असणारे लोकांच्या जीवनात कामाला महत्त्वाचे स्थान असते. अशी माणसे काम व ती काम करणाया लोकांना सारखेच महत्त्व देतात. निर्णय प्रक्रियेत असलेल्या सक्रिय सहभागामुळे व्यावसायिक बांधिलकी वाढते परिणामता निर्णयांची स्वीकृती आणि समाधान वाढते. गझील आणि वेसीस (१९९०) यांनी, असे म्हटले आहे कि, शिक्षकांच्या निर्णय प्रक्रियेतील असलेल्या वाढता सहभाग म्हणजे व्यावसायिक दिशा देण्याचा एक गुणधर्म आहे. स्वत्वकार्यक्षमतानुसार स्वत्वकार्यक्षमता असलेले शिक्षक त्यांच्या शिकविण्याबाबतीत उत्सुक असतो. (गुसके,१९८४) एका पातळीची बांधिलकी असलेले शिक्षक, शिक्षकीपेशात राहणे पसंत करतात.



Vol: 5th, Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June. 2016,ISSN : 2319-5525

थंम्पन . वी . (१९९७) यांनी शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचे वेगवेगळया घटकांवर प्रकाशझोत टाकला आहे .

- ✓ शिक्षकाचे विषयज्ञान
- ✓ विदयार्थ्यांसाठीचे योगदान
- ✓ शाळा, विदयार्थी आणि इतर शिक्षकांशी असलेली घनिष्ठता
- ✓ प्रामाणिकता आणि योग्य मोबदला
- ✓ शिक्षणाच्या आदानप्रदानात अडचणी सोडविण्यात मदतीची प्रवृत्ती
- ✓ सुधारित साधने बनविण्यात असलेली प्रवीणता .

एन . सी . टी . ई . ने क्षमताधिष्ठित व बांधिलकी प्रमाणित शिक्षण प्रशिक्षणात दर्जात्मक शिक्षणावर भर दिला आहे असे गृहीत धरले जाते की, जर शिक्षकांला व्यावसायिक पात्रता आणि बांधिलकी आत्मसात झाली तर त्याच्या कामात उत्तमता येते . व्यावसायिक बांधिलकीमुळे शिक्षकांमधील क्षमताचा उपयोग त्यांचे सर्वोत्तम काम करण्यात तर होतोच त्याच बरोबर त्या गुणांची जोपासना करण्याची प्रेरणा त्यांना मिळते .

निष्ठापुर्वक कोणतेही कार्य श्रेष्ठ दर्जाचे असते . शिक्षकाच्या ठिकाणी अध्यापनाविषयीचे सखोल ज्ञान वर्गा तील कार्यप्रवणता याबरोबरच अध्यापन व्यवसायाबाबतची निष्ठा असणे गरजेचे असते शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीवरच शिक्षणाचा दर्जा अवलबून असतो .

व्यवसाय केद्रीत असलेल्या व्यक्तीजवळ उच्च व्यावसायिक बांधिलकी असते व्यावसायिकतेमध्ये खालील कृती दिसून येते .

१ व्यावसायिक अनुभव हे निवडलेल्या क्षेत्रामध्ये उच्च गुणवत्तापुर्ण कार्यमान वाढविण्यास मदत करते .

२ संघटनात्मक प्रशासनावरून बांधिलकी ठेरत असते जर प्रशासनाकडून कर्मचायास कामाचे दडपण असेल तर कार्य करताना त्याचा व्यावसायिकपणे स्वीकार केला जात नाही .

३ या व्यक्ती व्यवसायाच्या मूल्या संदर्भात उच्च आदर्शवादी असतात .

४ संस्थेमध्ये त्या व्यक्तीच्या अंगी असलेली कौशल्ये क्षमता यांचा पुरेपुर वापर करून घेतला जात नाही असे वाटू नये . ज्या गोष्टीसाठी त्या व्यक्तीने प्रशिक्षण घतले आहे त्या गोष्टी करण्याची संधी मिळाली नाही . तेव्हा त्यांच्या आत्मभानाला धक्का पोहचतो .

५ संस्थेच्या प्रतिष्ठेसाठी संघटनात्मक खेळ खेळण्याचे प्रकार टाळावेत . परंतू इतर संस्थेबरोबर स्पर्धा करण्यासाठी संस्थेच्या गुणवता वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक असते .

६ वाहेरील व्यावसायिक संस्थामधील कर्मचायाकडून किंवा व्यक्तिकडून चांगले शिकण्याचा किंवा स्वीकारण्याचा प्रयत्न करणे .

व्यावसायिक बांधिलकीवर परिणाम करणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत
१ महत्वाच्या व्यक्तिकडून असलेल्या अपेक्षा
२ व्यावसायविषयी असणारी आवड
३ आंतरिक प्रेरणा
४ सामाजिक पाठिंवा
५ सामुहिक सकारात्मक दृष्टिकोन
६ नाविन्यतेचा स्वीकार
७आवश्यक हेतूसाठी कौशल्य विकासाची इच्छा
८कार्य समाधान
९ प्रेरणा
१0 संघटनात्मक वातावरण

साहित्यामध्ये व्यवसाय या संकल्पनेचा संबधं काही वेळा वक्तृत्वाशी आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून उयुक्ततेशी जोडला गेला आहे की ज्यावेळी व्यावसायिक दृष्टिकोन कौशल्य आणि सेवा गुणात्मकतेने वाढविला जातो . सेवा आणि कौशल्यामुळे व्यावसायिक दृष्टिकोन अधिकाधिक विकसित होतो . त्रेले हयांनी व्यवसायाचे काही गुणधर्म सागितले आहेत ते गुणधर्म पुढीलप्रमाणे आहेत .

१ खडतर सामाजिक परिस्थितीतही व्यवसाय व्यवस्थितपणे केला जातो .
२ व्यवसायासाठी योग्य पध्दत व कौशल्याची गरज असते .
३ व्यवसायासाठी पध्दतशीर ज्ञाानाची गरज असते . की जे ज्ञानाने वाढविली जाते .
४ उच्च शिक्षणात विशेष कौशल्याची गरज असते . की जी ज्ञानाने वाढविले जातात .
५ ग्राहक हा व्यवसायाचा केंद्रविदूं असतो त्यामुळे व्यवसायाची एक संहिता असते .
६ व्यवसायनिर्णय स्वातज्र्य व योग्य सराव म्हत्वाचा असतो .
७ व्यवसायामध्ये नियंजन आणि योग्य प्रतिसाद आवश्यक असतो .

व्यवसाय प्रकारातील एक महत्वपूर्ण व सेवा देणारा व्यवसाय म्हणजे शिक्षकी व्यवसाय होय . शिक्षकाची बाधिलकी ही करत असलेल्या चांगल्या कामाशी असते .

सांराश ः

“ज्ञानम मनुजाच तृतीय नेत्रम अर्थात ज्ञान हा मानवाचा तिसरा डोळा आहे” . आज २१ व्या शतकात उत्तम नागरिक निर्माण करण्याची महत्वाची जबावदारी शिक्षकांची आहे . म्हणुन शिक्षकांची व्यावसायिक



Vol: 5th , Issue : I, English-Marathi, Quarterly: 1st June. 2016,ISSN : 2319-5525

बांधिलकी उच्च असावी अशी समाजाची अपेक्षा असते . शिक्षकांने व्यवसायात येताच जो शिकू शकतो तो शिकवू शकातो हा मंत्र ध्यानात घेवून विषय ज्ञान त्यानुसार अध्यापन कौशल्ये आत्मसात करावीत विश्वबंधु त्याची व्यापक शिकवण देणा–या भारतीय संस्कृतीचा शिक्षकास अभिमान असावा पाश्चात्य ज्ञान कल्पना शक्ती भारतीय विकासासाठी उपयुक्त असल्या तरी देखील शिक्षकांने आपल्या समाजासाठी आपल्या अंतरंगातून निर्मिती करण्याचा प्रयन्त करणे महत्वाचे आहे .

सामाजिक परिवर्तनाचा प्रेरक असलेला शिक्षक हा सामाजिक पुनर्रचना व परिवर्तनाची तळमळ असणारा असावा त्याला सामाजिक समस्यांची व त्यावरील उपायांची योग्य जाण असावी तो नोकरशाही निष्ठा उपाय असणारा दूवा स्वतः सुजाण कर्तव्यदक्ष नागरिक हवा . भविष्यकालीन चिंतनशील दूष्टी असणारा व योग्य धोरणे ध्येय दिशा यांचा सांगोपांग विचार करणारा शिक्षक लोक मानसामध्ये सामाजिक व संस्कृतीक बांधिलकी निर्माण करू शकतो .

सदय परिस्थीती पहाता आजचा शिक्षक हा तणावग्रस्त होत चालला आहे . यामुळे तो वैफल्यग्रस्थ होत आहे . आणि या वाढत्या ताणताणावामुळे शिक्षक हा व्यवसायिक बांधिलकी विसरत चालला आहे व तो नवीन पीढी घडवत आहे यासाठी त्याला योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे आहे म्हणुनच व्यवसायिक बांधिलकी या विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे .

संदर्भ साहित्य सूची ः

१ )वन्सी बिहारी पंडीत लता मोरे युनुस पठाण उदयोमुख भारतीय समाजातील शिक्षक पिपंळापूर ॲण्ड पब्लिशर्स नागपूर
२) डॉ दुनाखे डॉ लीना देशपााडे प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र नित्य नुतन प्रकाशन
३) प्रा वीरकर डॉ प्रतिमा वीरकर उदयोमुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक शैक्ष्डाणिक समाजशास्त्र पुणे विदयार्थी गृह प्रकाशन पुणे ३0
४ ) प्रा निलिमा सप्रे प्राचार्य डॉ प्रीती पाटील शिक्षणातील विचार प्रवाह फडके बुक हाऊस
५ )प्रा डॉ लोढे डॉ तापकीर विदयमान शिक्षणातील नव विचार प्रवाह पुणेप्रकाशन २
६) प्रीती पाटील शिक्षणातील नव विचारप्रवाह फडके प्रकाशन
७) डॉ . क्षमालिमये, मूल्यशिक्षण,विदया विकास मंडळ, नागपूर १५ ऑगस्ट १९९८
८) भारतीय शिक्षण,महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ मे २०१४
९) डॉ . सूरेशकरंदीकर, मूल्यशिक्षण
१० )एन . सी . टी . ई व्यावसायिक बांधिलकीचे पाच क्षेत्रे शिक्षक प्रशिक्षण Retrieved on 6th September ,२०१३ .

▪▪▪